**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर- ४१६००४.**

---

क्र.कोविमं/उमा-माध्य.गोप./ २४३३
कोल्हापूर-४१६ ००४.
दिनांक :- १९.११.२०१९

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक व उच्च माध्य.शाळा,
जिल्हा-सातारा, सांगली, कोल्हापूर.

विषय :- माध्यमिक शाळा व कनिष्ठ महविद्यालयांचे प्रोफाईल
भरण्याच्या मुदतवाढीबाबत.....

संदर्भ :-१)राज्य मंडळाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-८/४९६३, दिनांक ३०.०९.२०१९ चे पत्र.
२)राज्य मंडळाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-८/५३८२, दिनांक २४.१०.२०१९ चे पत्र.
३)राज्य मंडळाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-८/५७२४, दिनांक १८.११.२०१९ चे पत्र.

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्र क्र.०२ अन्वये शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाकडून अद्ययावत माहितीबाबतचे प्रोफाईल भरण्याबाबतची मुदत वाढवून ती दिनांक ३०.१०२०१९ ते ११.११.२०१९ या कालावधीपर्यंत देण्यात आलेली होती.

तथापि याबाबत असे निदर्शनास आलेले आहे की, कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील बऱ्याच शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रोफाईल भरण्याची प्रक्रिया अद्याप पूर्ण केलेली नाही. ही बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची आहे.

राज्य मंडळाने उपरोक्त संदर्भीय पत्र क्र.०३ अन्वये प्रोफाईल भरण्याची पुनश:च अंतिम मुदत दिनांक १९.११.२०१९ ते ०५.१२.२०१९ या कालावधीपर्यंत वाढविण्यात येत आहे.

तेव्हा ज्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी अद्याप प्रोफाईल भरलेली नाही त्यांनी सदर मुदतीत प्रोफाईल भरण्याची कार्यवाही पूर्ण करावी. यानंतर मुदतवाढ देण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**